ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

# AJANTA

VOLUME - VI, ISSUE - IV

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

VOLUME - VI ISSUE - IV OCTOBER - DECEMBER AURANGABAD

| IMPACT FACTOR / INDEXING |
| --- |
| 2016 - 4.205 |
| www.sjifactor.com |


✦ EDITOR ✦

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),

M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

**Ajanta Prakashan**

**Aurangabad. (M.S.)**

## CONTENTS


| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| ७ | संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त झालेला कर्मसिद्धांत<br>**वाल्मीक भावराव गवळी**<br>**डॉ. मनोहर सिरसाट** | २४-२७ |
| ८ | लोकतत्त्वाचा एकनिष्ठ धागा - महानोरांची कविता<br>**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे** | २८-३० |
| ९ | मराठा : अस्मितेच्या पेचात अडकलेला समाज<br>**डॉ. आर. बी. शेजुळ** | ३१-३६ |
| १ | पृथ्वीराज रासो की ऐतिहासिकता एवं प्रामाणिकता<br>**डॉ. कल्पना वर्मा** | १-३ |
| २ | भारत में महिला सशक्तिकरण में शिक्षा की भूमिका : एक यथार्थ अवलोकन<br>**सुरेन्द्र प्रताप** | ४-८ |
| ३ | समकालीन हिन्दी दलित कहानियों में सामाजिक यथार्थ<br>**विवेक जगन्नाथ पाखरे** | ९-१० |


**'अजिंठा'** या त्रैमासिकात प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वतः लेखकावर राहील. हे नियतकालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर अँण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

८

# लोकतत्त्वाचा एकनिष्ठ धागा - महानोरांची कविता

**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**

मराठी विभाग,कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता. गेवराई, जि. बीड.

कविता अनेक वळणात अवतरते, विस्तारते आणि त्या-त्या काळानुरूप स्वत:च्या साच्यात बदल सुद्धा करून घेते. म्हणून कविता जुनी अथवा नवी ठरत नाही. तर कायमच ती एका नव्या आविष्कृत रूपात उरते. अभंग, ओवी ह्या तर लोकधारणााच बनून उभ्या आहेत. यातच लोकतत्त्वांचा धागा पकडून नामदेव धोंडो महानोर यांची कविता पुन्हा नव्या रूपात अवतरते. रंगनाथ पठारे म्हणूनच असे म्हणाले की, 'लोकभाषा आणि लोकसंस्कृतीतल्या अभिजात लयी, त्यांच्यातील अलवार, सुकोमल धाग्यांसह महानोरांनी आपल्या समोर आणल्या. तसेच आपल्या परंपरेतील वाहत्या सतेज धारांचे भान आपल्याला दिले. त्यांनी गाव, रान, निसर्ग, माणसे यांच्यातील नात्यांच्या लावण्याचे अद्भुत प्रकटीकरण केले. कवितेची लय एक वेगळा संस्कार करत असते. मराठीत तर याची एक परंपराच आहे. त्यालाच तर तुम्ही आम्ही लोकतत्त्व असं म्हणतो. हाच लोकतत्त्वाचा, ज्ञानेश्वर तुकारामाचा शब्दकलेचा वारसा महानोर सांगतात.

आबादानी होवो शेत भरू दे दाण्याचे
तुझ्या पालखीला शब्द बांधू तुकोबाचे

अशा ओवीरूपाने पसायदान मागणारे महानोर आधुनिक मराठी कवितेत ग्रामसंस्कृतीला परंपरेचे वळण अन् नव्या शब्द रूपात व्यक्त करणारे रानबोलीचे कवी ठरतात. एवढेच नव्हे तर लोकगीताच्या वळणावर ही कविता झुलते आणि लयवेडी होते.

ह्या शेताने लळा लाविला असा असा की सुख दुःखाला परस्पराशी हसलो-रडलो। असे कविता क्षेत्रात पदार्पण करणारे महानोर साठोत्तरी कवितेत ठळकपणे आपल्या निष्ठांची, तत्त्वाची पायाभरणी करणारे ठरतात.

ना.धों महानोरांनी 'रानातल्या कविता' (१९६७)च्या रूपाने काव्यक्षेत्रात दमदार पाऊल टाकले. 'वही, पावसाळी कविता, पक्ष्यांचे लक्ष थवे, गाथा शिवरायांची, तिची कहानी, जगाला प्रेम अर्पावे, प्रार्थना दयाघना, अजिंठा, पानझड, पुन्हा एकदा कविता, दिवे लागणीची वेळ गंगा वाहू दे निर्मळ आणि त्या आठवणींचा झोका इ. कविता संग्रहातून महानोरांनी आपल्या शब्दकळा आणि कल्पनांना लयबद्ध केलेले आहे. माणसाच्या जीवनपद्धतीच्या अनेक पेचप्रसंगांना बाजूला सारून निसर्ग सौंदर्याला बोलके आणि रम्यतेला ग्रामीण स्पर्श दिला. बालकवी, बहिणाबाई, ना.घ. देशपांडे, बा.भ. बोरकर, इत्यादीनी चित्रित केलेल्या निसर्ग, सौंदर्य, रान इत्यादींना नव्याने शब्दबद्ध केले या दृष्टिकोनाला महानोरांनी परंपरागत तत्त्वांची जोड देऊन पुन्हा प्रवाहित करण्याचे काम केले.

कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लगडून जावे.

या लोकतत्त्वातील पुण्य, फळ, चांदणे अशा गोष्टी शब्द रूप घेवून येतात.

सावळा ग रामचंद्र माझ्या मांडीवर न्हातो
अष्टगंधाचा सुवास निळ्या कमळांना देतो.

असं संतांच्या तत्त्वाशी महानोरचं नातं जोडू शकतात कारण त्यांच्यावर झालेल्या लोकतत्त्वांचे संस्कार आणि [illegible] अनेक प्रतिमांना महानोर आपल्या ओवीबद्धतेतून कवितेत लयबद्ध करताना दिसतात. कारण त्यांच्या स्वभावाचा हा स्थायीभावच आहे. लोकसंस्था ही सकल्पना या महाराष्ट्राच्या भूमीत गेली आठशे वर्ष एका विशिष्ट पातळीवर आजही रूळताना दिसते. शेती आणि शेतीशी संबंधीत निसर्ग

चंद्र, कुटुंब इ.च्या भावनांना त्याला लोकभाषेतून व्यक्त केले तर त्यातील सौंदर्य अबाधित राहते. हाच अनुभव नव्याने प्रत्ययास येतो तो महानोरांच्या मुळे.

१९६० नंतरच्या काळात साहित्यिक क्षेत्रातील बदल वाङ्मयाच्या इतिहासात अधोरेखित करण्यात अनेक घटना- प्रसंग कारणीभूत ठरले. याचा परिणाम असा झाला की वेगवेगळ्या परिसरातून सामाजिक स्तरातून भाषिक वैशिष्ट्यासह कितीतरी कवी लिहू लागले. नगरा बाहेरचा आशय त्या परिसराच्या भाषा वैशिष्ट्यांसह व्यक्त करण्याची एक नवी रीत पुढे आली आणि याच प्रवाहात शैली, परंपरा, इतिहास इत्यादीला अनुसरून स्वत:च्या नवनिर्मितीचा एक स्रोत शोधले जाऊ लागले. यात ना.धो. महानोरांचे स्थान पसंतीच्या आणि जनामनापर्यंत पोहचण्यात वरच्या क्रमांकाचे ठरते कारण त्यांची लोकवाणी.

मुळातच कृषी संस्कृतीशी अतुट नाळीतून त्यांची स्वच्छंदतावादी वृत्ती विकसितच होत गेली आणि त्यातून त्यांना लोकसाहित्याच्या विविध दालनांची समृद्ध परंपरा आपलीसी वाटली याचाच परिपाक म्हणून लोकसाहित्य आणि लोकगीत परंपरा महानोरांनी ताकदीनीशी योजिली.

सरल दळण ओवी अडली जात्यात
उभ्या जन्माचा उमाळा कळ सोसून डोळ्यात
किवा
बोरी वो बाभळी ह्या मायेच्या झाल्या नारी
केळ कमळण झाली प्रसूत दुपारी

अशी जुन्याच पायवाटेने चालत चालत नवता पेरीत चालणारी महानोरांची कविता ग्रामीण जीवनातल्या सुख-दु:खाशी मनापासून समरस झाली म्हणूनच ती त्या समरसतेतून त्या-त्या सुख-दु:खाच्याच भाषेत अवतरली. तीने शेतीशी संबंधीत असणाऱ्या जाणकारांच्या मनाचा ठाव घेतला. एका अर्थी नवा वाचक, नवा रसिक वर्ग मराठी कवितेला मिळाला. म्हणूनच निसर्ग कवितेत सुद्धा महानोरांच्या कवितेला वेगळे स्थान द्यावे लागते.

महानोरांनी आपल्या अनुभवांना ओवी, अभंग, म्हणी, लावणी अशी लोकलयीत चित्रित केले. आणि संताच्या गावचा ठेवा मराठी कवितेने पुन्हा खुला केला असेच म्हणावे लागते. ज्या योगे कीर्तन, प्रवचनातील लोकतत्त्वाचा भाव वाचकांना शब्दरूपात भेटता झाला. प्रसंगी ग्रामीण संस्कृती सर्व गुण विशेषासह, भावानुभावासह अवतरली त्यात सौंदर्यासह येणे म्हणजे शृंगारिकता कशी वजा करता येईल.

कीती जिवाला राखायचं राखलं, रात्रा तुम्ही जाळ्यात पाखरू टाकलं - ही लोकभाषेतील सुंदर प्रतिमा आणि या सर्वांचा परिपाक म्हणजे ना.धों महानोरांच्या गीतांनी चित्रपट क्षेत्रात सुद्धा आपला एक वेगळा प्रांत निर्माण केला.

पिकातून पाखरांचा धिगांना मनमानी
केसरात न्हाली कोणी मैना गोजिरवाणी ।

स्त्री ही लोकसाहित्यातून अनेक प्रतिमा आणि प्रतीकातून सदैव चित्रित झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर महानोरांच्या कवितेतील स्त्री सुद्धा निसर्ग रूपकातून प्रतीत होते. ती स्वत:च्या स्वतंत्र व्यक्तीमत्त्वासह.

'डोळे थकून थकून गेले.
पाखरासारखा येऊन जा
रान भलतंच भरात, जरा
पिकात धुडगूस घालून जा' (रा.क.)

आशयाला शब्द रूप देताना प्रतिमाही तितक्याच तोलामोलाच्या लागतात आणि शब्दांच्या विविध कळाही तितक्याच समृद्ध लागतात यासाठीच लोकभाषेचा विस्तारित गेलेल्या परंपरागत वारसा उपयोगी पडतो. हेच तत्त्व महानोरांच्या काव्य आशयाला अधिक बोलकं, अधिक ठळक करत.तेव्हाच त्यांच्या कवितेतून पाखरं, भर, पिक आणि धुडगूस अशी नवी मांडणी लोकलयीच्या थाटात मिरवताना दिसते. पुढे -

विठ्ठला शेजारी रूक्मिणी बसेना

अब्विर गुलालाची गरदी सोसेना' (प.गा.)

ही पळसखेड्यांच्या परिसरातील आध्यात्मिक तत्त्वज्ञानाला महानोरांचा अनुभव अत्यंत बोलकं रूप देतो. लोकतत्त्व, लोकमानस हे तत्कालीन लोकगीतातून व्यक्त होत असतं. ग्रामीण जीवनाचा खास खरा आविष्कार म्हणजे लोकगीत. एका स्वाभाविक लयीत आणि लोकजीवनातल्या घटकांमधून निर्माण होणाऱ्या प्रतिमांमधून महानोरांच्या कवितेवर या लोकगीतांचा त्यातील प्रतिमांचा आणि लोकगीतांच्या लयीचा परिणाम आहे. असे नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात. म्हणूनच महानोरांची कविता राना-मातीच्या गंधासह-भावानुभवाची शब्दशक्ती ठरते.

आता तर हा जीवच अवघा असा जखडला

मी त्यांच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो

असे हे काव्यनिर्मितीचं सूत्र विजया राजाध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणे महानोरांच्या कवितेचं लक्षणगीतही आहे. महानोरांनी याच रान-मातीतून आशय-विषय निवडला आणि लोकतत्त्व लोकलय यांच्याशी त्यांची जोड घातली. बोली रूपातून त्यात प्राणतत्त्व ओतले म्हणूनच महानोरांची कविता संवदेनशीलतेने मनाचा ठाव घेताना दिसते. केवळ याच तत्त्वामुळे निसर्ग प्रवाहातसुद्धा केवळ हिरवळ, मनमोहक दृश्य, सौंदर्य यापेक्षा रान, पिकं, झांड, चादंण, इत्यादीनी नाविण्य आणि वास्तवाच्या सेतूवर काव्याशयाला लयबद्ध करून झुलत ठेवतात हे प्रत्यायस आणून दिले. आणि निसर्गाच्या निर्माणाला शब्दाकार देण्यात महानोर यशस्वी झाले.

लोकगीताच्या वळणाने आलेला निसर्ग अत्यंत बोलका होता आणि हाच एकनिष्ठ धागा महानोरांची कविता पकडते म्हणून तर निसर्ग कवितेच्या प्रवाहातच नाही तर एकूणच मराठी कवितेत ना.धों महानोरांच्या कवितेला सर्वात जास्त जनाधार मिळाला असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. लोकगीतातून स्वत:शीच केलेला संवाद सर्व ताण हलका करत राहतो. मात्र महानोरांनी त्यांच्या परपरेतच निर्माण केलेला वास्तवाचा शब्दाविष्कार भाषेसोबतच कवितेतही वेगळा टप्पा गाठतो.

## संदर्भ ग्रंथ

१) पुन्हा साहित्य रूप - दादा गोरे

२) आधुनिक मराठी कविता : एक विश्लेषण - प्रकाश देशपांडे केजकर

३) महानोरांची कविता - संपादक, श्रीकांत देशमुख

४) कविता आणि प्रतिमा - सुधीर रसाळ